**महाराष्ट्र शासन**

क्र.:- अधापु २०१६/प्र.क्र.११६/नापु २२
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई
दिनांक:- ०६ ऑगस्ट, २०१६

प्रति,

१) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
२) सर्व उपायुक्त (पुरवठा),
३) सर्व जिल्हाधिकारी,
४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/ सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,

**विषय :- राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृह यांना माहे एप्रिल, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीकरिता अन्नधान्याचे मासिक व सहामाही नियतन मंजूर करण्याबाबत.**

**संदर्भ :-१) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक ४-६/२०१५-BP-II (Welfare Institutions), दिनांक १८ जुलै, २०१६.**
**२) शासन निर्णय क्रमांक साविव्य-१००२/११३७/प्र.क्र. ९७३/ ना.पु. २८,दि. २६.४.२००२**

राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृहे यांना माहे एप्रिल, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीकरीता बी.पी. एल. दराने अन्नधान्याचे मासिक नियतन वितरीत करण्यासाठी मागील कालावधीची शिल्लक विचारात घेऊन केंद्र शासनाने त्यांच्या दि. १८.०७.२०१६ च्या संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र राज्यासाठी २८५३.७५ मे. टन गहू व १५८३.८१६ मे. टन तांदूळ याप्रमाणे एकूण ४४३७.५६६ मे. टन अन्नधान्याचे नियतन मंजुर केले आहे.

२. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगाव, जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर (ग्रामीण) व जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांनी लाभार्थ्यांची सुधारीत संख्या कळविली आहे. तसेच उपआयुक्त (पुरवठा), औरंगाबाद यांनी देखील औरंगाबाद विभागातील लाभार्थ्यांची सुधारीत संख्या कळविली आहे, त्यानुसार सदर जिल्ह्यातील बदल विचारात घेऊन त्या जिल्ह्यातील नियतन मंजूर करण्यात आले आहे. उर्वरित जिल्ह्यांकरीता माहे ऑक्टोबर २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीकरीता मंजूर करण्यात आलेल्या जिल्हानिहाय कल्याणकारी संस्था व लाभार्थ्यांची संख्या विचारात घेऊन माहे एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ या कालावधीचे जिल्हानिहाय नियतन मंजूर करण्यात येत असून ते सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आले आहे. संबंधीतांनी सदर नियतनाची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या नजिकच्या गोदामातून बी.पी.एल. दराने अन्नधान्याचे पैसे भरुन करावी.

३. केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधीन दि. १८.०७.२०१६ च्या पत्रान्वये राज्याकडे शिल्लक असलेले अन्नधान्य विचारात घेऊन माहे एप्रिल, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीकरिता अन्नधान्याचे नियतन दिले आहे. त्यामुळे जिल्हानिहाय नितयन देताना ज्या जिल्ह्यांकडे मागील अन्नधान्य शिल्लक नाही, अशा जिल्ह्यांना पूर्ण प्रमाणात नियतन दिले आहे. तसेच ज्या जिल्ह्यांकडे पुरेशी शिल्लक नाही, त्या जिल्ह्यांना

देखील केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या नियतनामधून काही प्रमाणात अन्नधान्याचे नियतन देण्यात आले आहे. सदर जिल्ह्यांनी प्रथम आवश्यकतेनुसार त्यांच्याकडील मागील शिल्लकीतून अन्नधान्याचे वाटप करावे व ते अन्नधान्य पुरेसे नसल्यास भारतीय अन्न महामंडळाकडून अन्नधान्याची उचल करावी. ज्या जिल्ह्यांकडे मागील कालावधीतील पुरेसे अन्नधान्य शिल्लक आहे, त्या जिल्ह्यांना अन्नधान्याचे नियतन देण्यात येत नसून त्या जिल्ह्यांनी त्यांना देय असलेल्या नियतनाच्या प्रमाणात मागील शिल्लक अन्नधान्यातून अन्नधान्याचे वाटप करावे. सोबतच्या विवरणपत्रामध्ये पात्र लाभार्थ्यांनुसार मासिक तसेच ६ महिन्यांचे आवश्यक नियतन स्तंभ क्र. १४ ते १९ मध्ये दर्शविण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्याकडे असलेली मागील शिल्लक विचारात घेऊन भारतीय अन्न महामंडळाकडून सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र. १७ ते १९ मध्ये दर्शविण्यात आलेल्या आकडेवारीनुसार (नियतनानुसार) अन्नधान्याची उचल करावी.

४. केंद्र शासनाने उपरोक्त पत्रान्वये माहे एप्रिल, २०१६ ते माहे जून, २०१६ या कालावधीकरीता मंजूर करण्यात आलेल्या नियतनाची रक्कम जमा करण्यासाठी व धान्याची उचल करण्यासाठी त्यांच्या सदर पत्राच्या दिनांकापासून ४५ दिवस आणि माहे जुलै, २०१६ साठी त्यांच्या सदर पत्राच्या दिनांकापासून ५० दिवसाप्रमाणे मुदत देण्यात आली आहे. ऑगस्ट, २०१६ व सप्टेंबर, २०१६ या कालावधीकरीता मंजूर करण्यात आलेल्या नियतनाची रक्कम जमा करण्यासाठी व धान्याची उचल करण्यासाठी विद्यमान तरतूदीनुसार मुदत देण्यात आली आहे. राज्य शासनाने भारतीय अन्न महामंडळाकडून सदर अन्नधान्याची उचल बी.पी.एल. दराने करावयाची आहे, असे देखील सदर पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सबब भारतीय महामंडळाच्या नजिकच्या क्षेत्रिय कार्यालयाशी संपर्क साधून विहित मुदतीतच अन्नधान्याची रक्कम भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करुन स्तंभ क्र. १७, १८ व १९ मध्ये दर्शविलेल्या मासिक नियतनानुसार अन्नधान्याची भारतीय अन्न महामंडळाकडून उचल पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

५. कल्याणकारी संस्था व वसतीगृहे यांना अन्नधान्य वितरीत करावयाच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर आदेश संदर्भाधीन दि. २६.४.२००२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार अन्नधान्य वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी. केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये सूचित केल्यानुसार अन्नधान्याची उचल पूर्ण करण्यात यावी व माहे सप्टेंबर, २०१६ अखेर शिल्लक असलेल्या अन्नधान्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास विनाविलंब दि. ३१.१०.२०१६ पर्यंत शासनास सादर करावे.

सोबत :- विवरणपत्र

(हेमंत वाडीकर)
कक्ष अधिकारी

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१) महाव्यवस्थापक, व भारतीय अन्न महामंडळ, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे मंजूर केलेले नियतन मुक्त (release) करण्याच्या सुचना सर्व जिल्हा प्रबंधक भारतीय अन्न महामंडळ यांना तात्काळ द्याव्यात

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव , मुंबई, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

३) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई. यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील महाफुड आज्ञावलीद्वारे प्राप्त करुन घ्यावा.

४) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई तसेच सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर आदेशान्वये केलेले नियतन विचारात घेऊन अन्नधान्याचे वाटप करावे.

(हेमंत वाडीकर)
कक्ष अधिकारी

प्रत,

१) अवर सचिव (संगणक कक्ष), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत नियतनाचे आदेश विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावेत.

२) निवड नस्ती - ना.पु.२२

# ALLOCATION FOR WELFARE INSTITUTIONS SCHEME FOR THE PERIOD FROM APRIL 2016 To SEPTEMBER 2016

| SR.NO | DISTRICTS | NO OF INSTITUTIONS | NO OF BENEFICIARIES | PREVIOUS BALANCE (Upto 31st March 2016) | | | QUANTUM PER BENEFICIARY PER MONTH (KG) | | | Required ALLOCATION FOR 6 MONTHS (MT) | | | Actual ALLOCATION FOR 6 MONTHS (MT) | | | Actual ALLOCATION FOR 1 MONTH (MT) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 1 | MUMBAI | 96 | 23195 | 0 | 0 | 0 | 11 | 4 | 15 | 1510 | 434 | 1944 | 1510 | 434 | 1944 | 252 | 72 | 324 |
| 2 | THANE | 22 | 3294 | 207.754 | 118.622 | 326.376 | 5 | 10 | 15 | 93 | 181 | 275 | 0 | 63 | 63 | 0 | 10 | 10 |
| 3 | PALGHAR | 73 | 10324 | 592.28 | 707.52 | 1299.8 | 5 | 10 | 15 | 299 | 581 | 880 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | RAIGAD | 47 | 9699 | 0 | 0 | 0 | 5 | 10 | 15 | 276 | 535 | 811 | 276 | 535 | 811 | 46 | 89 | 135 |
| 5 | RATNAGIRI | 63 | 6390 | 218.86 | 117.25 | 336.11 | 5 | 10 | 15 | 182 | 353 | 534 | 0 | 236 | 236 | 0 | 39 | 39 |
| 6 | SINDHUDURG | 15 | 624 | 44.71 | 56.54 | 101.25 | 5 | 10 | 15 | 18 | 34 | 52 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | NASIK | 88 | 24197 | 683.23 | 367 | 1050.23 | 11 | 4 | 15 | 1575 | 452 | 2027 | 392 | 85 | 977 | 149 | 14 | 163 |
| 8 | DHULE | 116 | 16206 | 440 | 85.51 | 525.51 | 11 | 4 | 15 | 1055 | 302 | 1357 | 615 | 217 | 832 | 103 | 36 | 139 |
| 9 | NANDURBAR | 96 | 14420 | 256.5 | 159 | 415.5 | 5 | 10 | 15 | 411 | 796 | 1207 | 154 | 637 | 792 | 26 | 106 | 132 |
| 10 | JALGAON | 155 | 19624 | 333.024 | 120.79 | 212.234 | 11 | 4 | 15 | 1278 | 366 | 1644 | 944 | 487 | 1431 | 157 | 81 | 239 |
| 11 | AHMEDNAGAR | 207 | 20197 | 651.602 | 144.585 | 796.137 | 11 | 4 | 15 | 1315 | 377 | 1692 | 663 | 232 | 896 | 111 | 39 | 149 |
| 12 | PUNE DSO | 89 | 8126 | 0 | 0 | 0 | 11 | 4 | 15 | 529 | 152 | 681 | 529 | 152 | 681 | 88 | 25 | 113 |
| 13 | PUNE FDO | 25 | 8889 | 6.3 | 5.34 | 11.64 | 11 | 4 | 15 | 579 | 166 | 745 | 572 | 161 | 733 | 95 | 27 | 122 |
| 14 | SATARA | 103 | 9423 | 319.96 | 168.16 | 488.12 | 11 | 4 | 15 | 613 | 176 | 789 | 293 | 8 | 301 | 49 | 1 | 50 |
| 15 | SANGALI | 102 | 6835 | 0 | 0 | 0 | 11 | 4 | 15 | 445 | 128 | 572 | 445 | 128 | 572 | 74 | 21 | 95 |
| 16 | SOLAPUR DSO | 121 | 10873 | 364.677 | 101.134 | 465.811 | 11 | 4 | 15 | 708 | 203 | 911 | 343 | 102 | 445 | 57 | 17 | 74 |
| 17 | SOLAPUR FDO | 7 | 1658 | 0 | 0 | 0 | 11 | 4 | 15 | 108 | 31 | 139 | 108 | 31 | 139 | 18 | 5 | 23 |
| 18 | KOLHAPUR | 63 | 5316 | 364.828 | 41.978 | 406.806 | 11 | 4 | 15 | 346 | 99 | 445 | 0 | 57 | 57 | 0 | 10 | 10 |
| 19 | AURANGABAD | 97 | 9034 | 75 | 55 | 130 | 11 | 4 | 15 | 588 | 169 | 757 | 513 | 114 | 627 | 86 | 19 | 104 |
| 20 | JALNA | 82 | 8917 | 554.231 | 33.756 | 587.987 | 11 | 4 | 15 | 580 | 166 | 747 | 0 | 133 | 133 | 0 | 22 | 22 |
| 21 | BEED | 233 | 20757 | 0 | 0 | 0 | 11 | 4 | 15 | 1351 | 387 | 1739 | 1351 | 387 | 1739 | 225 | 65 | 290 |
| 22 | NANDED | 451 | 39908 | 280 | 34 | 314 | 11 | 4 | 15 | 2598 | 745 | 3343 | 2318 | 711 | 3029 | 386 | 118 | 505 |
| 23 | PARBHANI | 171 | 13025 | 186 | 44 | 230 | 11 | 4 | 15 | 848 | 243 | 1091 | 662 | 199 | 861 | 110 | 33 | 143 |
| 24 | HINGOLI | 164 | 12811 | 196 | 39 | 235 | 11 | 4 | 15 | 834 | 239 | 1073 | 638 | 200 | 838 | 106 | 33 | 140 |
| 25 | LATUR | 272 | 22126 | 584.1 | 93.4 | 677.5 | 11 | 4 | 15 | 1440 | 413 | 1853 | 856 | 319 | 1176 | 143 | 53 | 196 |
| 26 | OSMANBAD | 161 | 12788 | 188.99 | 29.14 | 218.13 | 11 | 4 | 15 | 832 | 239 | 1071 | 644 | 209 | 853 | 107 | 35 | 142 |
| 27 | AMRAVATI | 170 | 25000 | 1702 | 206 | 1908 | 11 | 4 | 15 | 1628 | 467 | 2094 | 0 | 261 | 261 | 0 | 43 | 43 |
| 28 | AKOLA | 178 | 8054 | 105 | 49 | 154 | 11 | 4 | 15 | 524 | 150 | 675 | 419 | 101 | 521 | 70 | 17 | 87 |
| 29 | WASHIM | 103 | 7924 | 338 | 23 | 361 | 11 | 4 | 15 | 516 | 148 | 664 | 178 | 125 | 303 | 30 | 21 | 50 |
| 30 | BULDHANA | 255 | 15794 | 400 | 110 | 510 | 11 | 4 | 15 | 1028 | 295 | 1323 | 628 | 185 | 813 | 105 | 31 | 135 |
| 31 | YAVATMAL | 259 | 26287 | 1247 | 416 | 1663 | 11 | 4 | 15 | 1711 | 491 | 2202 | 464 | 75 | 539 | 77 | 12 | 90 |
| 32 | NAGPUR DSO | 132 | 13009 | 249.435 | 5.711 | 255.146 | 11 | 4 | 15 | 847 | 243 | 1090 | 597 | 237 | 834 | 100 | 40 | 139 |
| 33 | NAGPUR FDO | 71 | 9062 | 668.88 | 34 | 702.88 | 11 | 4 | 15 | 590 | 170 | 760 | 0 | 136 | 136 | 0 | 23 | 23 |
| 34 | WARDHA | 92 | 5311 | 544 | 2 | 546 | 11 | 4 | 15 | 346 | 99 | 445 | 0 | 97 | 97 | 0 | 16 | 16 |
| 35 | BHANDARA | 110 | 7861 | 2160 | 1082.5 | 3242.5 | 5 | 10 | 15 | 224 | 434 | 658 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 36 | GONDIA | 122 | 13065 | 668.44 | 598.14 | 1266.58 | 5 | 10 | 15 | 372 | 721 | 1093 | 0 | 123 | 123 | 0 | 21 | 21 |
| 37 | CHANDRAPUR | 149 | 16678 | 581.72 | 393.84 | 975.56 | 5 | 10 | 15 | 474 | 921 | 1395 | 0 | 527 | 527 | 0 | 88 | 88 |
| 38 | GADCHIROLI | 160 | 28235 | 296.126 | -242.254 | 53.872 | 5 | 10 | 15 | 803 | 1559 | 2362 | 507 | 1801 | 2308 | 84 | 300 | 385 |
| | TOTAL | 4910 | 515126 | 15508.647 | 4958.082 | 20466.729 | | | | 29474 | 13663 | 43137 | 17122 | 9502 | 26624 | 2854 | 1584 | 4437 |

No.4-6/2016-BP-II (Welfare Institutions)
Government of India
Ministry of Consumer Affairs, Food and Public Distribution
Department of Food and Public Distribution

Krishi Bhavan, New Delhi
Dated the 18th July, 2016

To
The Chairman-cum-Managing Director,
Food Corporation of India,
16-20, Barakhamba Lane,
New Delhi – 110001

Subject: Allocation of foodgrains under Welfare Institutions Scheme to the State Governments for the 1st half of 2016-17 i.e. from April 2016 to September 2016 – reg.

Sir,

I am directed to convey the approval of the Government of India for the monthly allocation of rice and wheat at BPL prices to the 09 State Governments under Welfare Institutions scheme for the 1st half of 2016-17 i.e. April, 2016 to September 2016 as per the details given below:-

(Quantity in tons)

| S. No. | Name of State/UT Govt. | Rice ( Per month) | wheat ( Per month) |
|---|---|---|---|
| 1. | Goa* | 1.567 | 4.753 |
| 2. | Gujarat | 0 | 928.06 |
| 3. | Jammu & Kashmir** | 498.97 | 430.538 |
| 4. | Madhya Pradesh | 0 | 625.00 |
| 5. | Maharashtra*** | 1583.816 | 2853.75 |
| 6. | Odisha# | 803.525 | 0 |
| 7. | Sikkim | 11.39 | 0 |
| 8. | Tamil Nadu## | 2546.415 | 0 |
| 9. | West Bengal### | 96.007 | 48.860 |
| | **Total** | **5541.69** | **4890.961** |

* The above allocation of foodgrains to State Government of Goa has been made after adjustment of unspent balance of 156.196 tons of Rice and 42.52 tons of Wheat with Goa.

** The above allocation of foodgrains to State Government of Jammu & Kashmir has been made after adjustment of unspent balance of 6.157 tons of Rice and 416.77 tons of Wheat with J & K.

*** The above allocation of foodgrains to State Government of Maharashtra has been made after adjustment of unspent balance of 1897.1 tons of Rice and 9877.5 tons of Wheat with Maharashtra.

# The above allocation of foodgrains (rice) to State Government of Odisha has been made after adjustment of unspent balance of 1883.85 tons of Rice with Odisha.

## The above allocation of foodgrains (rice) to State Government of Tamil Nadu has been made after adjustment of unspent balance of 4067.91 tons of Rice with Tamil Nadu.

### The above allocation of foodgrains to State Government of West Bengal has been made after adjustment of unspent balance of 554.475 tons of Rice and 191.335 tons of Wheat with West Bengal.

2. The validity period for deposit of cost and lifting food grains for the months of April, May, June and July 2016 will be up to 45 days and 50 days respectively from the date of issue of this letter and for the subsequent months of August, 2016 to September, 2016 will be as per instant instructions of the Government.

3. FCI will release the above foodgrains (rice & wheat) as mentioned against each state from the nearest godown/depot of FCI to states on prepayment of the cost of the foodgrains at BPL rates by the concerned State Governments

4. FCI may give suitable instructions to their concerned Regional Offices, accordingly under intimation to this Department.

Yours faithfully,

Ahalder

(Asit Halder)
Under Secretary to the Government of India
Tele No. 23382504

Copy to:

1. The Secretaries, Department of Food, Civil Supplies and Consumer Affairs, State Governments of Goa, West Bengal, Tamil Nadu, Madhya Pradesh, Maharashtra, Sikkim, Jammu & Kashmir, Gujarat and Odisha with a request to ensure that the foodgrains are lifted within the validity period and distributed among the genuine beneficiaries under Welfare Institutions Scheme. Allocation for 2nd half of 2016-17 will be considered only on receipt of UCs for the 2nd half of the year 2015-16 from concerned State Government in the prescribed format GFR-19-A duly signed by the concerned Food Secretary. The onus for non-allocation of foodgrains on account of non-submission of UCs will rest entirely upon the concerned State Government.

2. General Manager (Sales), FCI, New Delhi.

3. Movt.-I/Policy I/US(BP-III/BP-I)/BP-I/Guard file.

CR-116/2016